पोलीस स्टेशन, राजापेठ अमरावती शहर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** राजापेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0414 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**15/08/2025 00:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 14/08/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/08/2025
**Time From (वेळेपासून):** 14:21 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/08/2025 **Time (वेळ):** 00:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/08/2025 00:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** राज्य उत्पादन शुल्क कार्यालय ,अमरावती विभाग अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मनोज नंदलाल जयस्वाल

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1975

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मालापुर ता बाभुळगांव,जि यवतमाळ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मालापुर ता बाभुळगांव,जि यवतमाळ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8007776291

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरज रतनसिंग दाबेराव | | | 1. कग्रेसनगर सिंग्रीचर,सोसायटी फ्लट नंबर 610,,सीव्हिंग अमरावती ,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | संजय िमाजी देहाडे | | | 1. एमआरकलनी फ्लट नंबर 2, भांदकर रेसीडन्सी अमरावती, अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

पोलीस स्टेशन, राजापेठ
अमरावती शहर



| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 15,000/ रुपये | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अप. नं. 414/2025 कलम 7,12भ्र.प्रति.अधि.1988
फिर्यादी - श्री. मनोज नंदलाल जयस्वाल, वय-50 वर्ष, व्यवसाय शेती,(किराणा.) रा.मु.पो. मालापुर ता. बाभुळगांव जि. यवतमाळ मो.क्र. 8007776291
आरोपी -1.श्री.सुरज रतनसिंग दाबेराव वय 50वर्श पद-निरीक्षक,नेमणुक राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती (वर्ग-2) रा.कॉंग्रेसनगर सिग्नीचर सोसायटी फ्लॅट नंबर 610, सी.व्हिंग अमरावती 2.श्री.संजय झिमाजी देहाडे वय 57 वर्ष पद-चालक, नेमणुक राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती (वर्ग-3) रा.एम.आर.कॉलनी फ्लॅट नंबर 2भांदकर रेसीडन्सी अमरावती
घटनास्थळ – राज्य उत्पादन शुल्क कार्यालय अमरावती विभाग अमरावती
घटना.ता.वेळ- दि. 14/08/2025 चे 14.21वा. ते 14.30वा. दरम्यान
दाखल.ता.वेळ- दि. 15/08/2025 चे
दाखल अधिकारी - प्रो. पोउपनि विपुल हुलावळे, पो.स्टे. राजापेठ अम. शहर
हकीकत अशाप्रकारे आहे की, मी दिनांक 13/08/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथे येवुन तक्रार दिली होती की,मी वरील पत्यावर कुटुंबासह राहत असुन माझे कडे असलेली 3 एकर शेती स्वतः करतो व किराणा दुकान चालवितो.मी माझे किराणा दुकानात मागील एक वर्षापासुन देशी विदेशी दारुची विक्री करतो.दि. 16.07.2025 रोजी मी घरी असताना राज्य उत्पादन शुल्क विभाग राजापेठ, अमरावती येथील पोलीस निरीक्षक सुरज दाबेराव व त्यांचे सोबतचे कर्मचारी माझे घरी आले व माझे किराणा दुकानात असणारा विदेशी दारुच्या तीन पेट्या कीं.अ. 30,000/रुपयाचा मुददेमाल पकडला त्यावेळी त्यांनी इतर ठिकाणी दाभा, मानिकवाडा येथील लोकांवर कार्यवाही केली होती.माझेवर कार्यवाही न करण्यासाठी पोलीस निरीक्षक सुरज दाबेराव यांनी मला 1,50,000/ रुपये मागणी केली. त्यावेळी मी साहेबाना कार्यवाही करु नका म्हणुन विनंती केली. म्हणुन मला घरापासुन पाच कीलोमीटर अंतरावर नेले व मला म्हणाले की,तुझी चारचाकी गाडी जप्त करतो व तुझे राहते घर सिल करतो नाहीतर पैसे दे असे म्हणाले व त्यांनी 1,50,000/रुपये मला मागितले. शेवटी गुन्हा दाखल न करण्याच्या अटीवर माझे मित्र अक्षय दातार यांचे समोर 1,00,000/-रु. मी दाबेराव साहेबांना दिले. त्यानंतर त्यांनी माझा पकडलेला माल व इतर दोन लोकांचा पकडलेला माल माझे चारचाकी वाहण क्र MH 29 AT 1036 होण्डा अमेझ या चारचाकी वाहनात टाकुन माझा वाहनासह फोटो घेतला व पंचनाम्यावर गावचे पोलीस पाटील मदारे यांची सही घेवुन माझी गाडी व मला घेवुन अमरावतीला जाण्यासाठी निघाले. मला पाच कि.मी. अंतरावर सोडुन दिले आणि माझी गाडी त्यांनी सोबत नेली. दोन दिवसानंतर मला राज्य उत्पादन शुल्क विभाग राजापेठ, अमरावती येथील दाबेराव साहेबांचे रायटर महेश म्हैसकर यांनी कॉल करुन सांगितले की,माझेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी मला मोबाईल वर एफ.आय.आर कॉपी पाठविली आणि गाडी सोडविण्यासाठी कोर्टात जाण्यासाठी सांगितले. माझे वाहन सोडण्याकरीता मला दाबेराव साहेब यांनी 15,000/- रुपयाची मागणी केली. तसेच त्यांनी मला मंथली पैसे दयावे लागतील असेही सांगितले. राज्य उत्पादन शुल्क विभाग राजापेठ, अमरावती येथे माझ्यावर गुन्हा दाखला झाला त्यामध्ये माझे जप्त करण्यात आलेले वाहन क्र MH 29AR 1036 होण्डा अमेझ हे वाहन सोडविण्यासाठी तसेच दारुचा धंदा सुरु ठेवण्यासाठी मंथली 15,000/ रुपये दयावे लागतील असे सांगितले. मला दाबेराव साहेब व म्हैसकर यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नाही. त्यांचेवर योग्य कार्यवाही करीता आपणाकडे लेखी तक्रार देत आहो

करीता त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही होण्यास विनंती आहे. अशा आशयाची लेखी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथील पो.नि.सुजाता बन्सोड यांचेकडे दिली होती.तेव्हा त्यांनी स्वतःचा व स्टाफचा परीचय करुन दिला व माझी तक्रार घेवुन उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय अमरावती येथील दोन कर्मचारी शासकीय पंच म्हणुन बोलावुन घेतले. त्यानंतर मला पंचाची ओळख करुन दिली. तसेच पंचाना माझी व स्टाफची ओळख करुन दिली. त्यानंतर पंच क्र.1 म्हणुन श्री.जयंत विश्वनाथ बोटके पद-दप्तरबंद व पंच क्रमाक.2 म्हणुन श्रीमती माधुरी हेमंत लबडे पद - शिपाई हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.पंचासमक्ष मी सांगितलेली तोंडी व लेखी तक्रार एकच असल्याची पंचांनी खात्री करुन पंचानी त्यावर सहया केल्या. त्यांनतर पो.नि.सुजाता बन्सोड यांनी पंच क्र.1 श्री. जयंत विश्वनाथ बोटके व पंच क्र 2 श्रीमती माधुरी हेमंत लबडे यांचे समक्ष पडताळणी पुर्व पंचनामा करुन मला व पंचाना आवश्यक त्या सुचना दिल्या.तसेच व्हॉईस रेकॉर्डर व मेमरीकार्ड बाबत माहीती देवुन " मला राज्य उत्पादन शुल्क अमरावती येथील श्री.दाबेराव साहेब व म्हैसकर यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे" याबाबत पडताळणी कार्यवाही करणे असल्याने दोन्ही लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता मला व पंच क्र.1 श्री. बोटके यांच्यासह राज्य उत्पादन शुल्क अमरावती विभाग कार्यालय येथे पाठविले.मी व पंच क्रमांक 1 असे माझ्या चारचाकी स्विफ्ट वाहन क्रमांक एम.एच 48 एस.4998ने राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती येथे गेलो होतो परंतु तेथे दोघही कार्यालयात उपस्थित नसल्याचे कार्यालयीन स्टाफने आम्हाला सांगीतले त्यानंतर त्यामुळे आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो परंतु माझी भेट श्री.दाबेराव साहेब व श्री.म्हैसकर यांचेसोबत झाली नाही. त्यानंतर मी पंचासमक्ष श्री.म्हैसकर यांना फोन केला असता त्यांनी सांगीतले की,मी बिमार असुन वर्धेला आहे तुम्ही ऑफीसला जा, असे म्हटले त्यानंतर मी श्री.दाबेराव साहेब यांना फोन केला असता त्यांनी मला म्हटले की, उदया दिनांक 14/08/2025 रोजी सकाळी 11/30 वा. कार्यालयात ये येतांना स्टॅपपेपर घेऊन ये त्यावरुन दिनांक 14/08/2025 रोजी पुन्हा दाबेराव यांची पडताळणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आज दिनांक 14/08/2025 रोजी पंच क्रमांक 1 व मला माझे चारचाकी वाहनाने श्री.दाबेराव साहेबांची भेट घेण्याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती कार्यालय येथे पाठविण्यात आले. तेथे मी श्री.दाबेराव यांना भेटण्यासाठी त्यांच्या कॅबीनमध्ये गेलो व सांगीतले की,सर मी स्टॅम्पपेपर सोबत आणला आहे त्यावर दाबेराव साहेब यांनी कार्यालयातील एका कर्मचा-याला बोलाविले व स्टॅम्पपेपरवर गाडी सोडण्याबाबतचे मॅटर टाईप करण्यास सांगीतले त्यावरुन सदर कर्मचा-याने स्टॅम्पपेपर वर सदर मॅटर टाईप केले. त्यानंतर मी दाबेराव सरांना गाडी सोडण्याबाबत विचारणा केली असता दाबेराव यांनी मला म्हटले की, तुझ्या सोबत गावात आणखी दारु विकणारे लोक आहेत त्यांचे व तुझे असे 20,000/-रु. मंथली आणुन दे, त्यावर मी त्यांचे सोबत तडजोड केली असता त्यांनी 15,000/- आणुन देण्यास सांगीतले व म्हटले की, तुझी गाडी काही सुरु होत नाही गाडीची चाबी तयार करुन गाडी घेवुन जा आधी पैसे आणुन दे असे म्हणुन गाडी सोडविण्यासाठी व मंथलीकरीता 15,000/-रु लाचेची मागणी केली.त्यांनतर मी दाबेराव साहेबांना म्हटले की, मी ए.टि.एम वरुन पैसे काढुन आणतो व गाडीची चाबी तयार करुन घेवुन येतो असे म्हणुन मी व पंच क्रमांक 1 असे ला.प्र.वि. अमरावती कार्यालय येथे परत आलो व सापळा पथकास सर्व हकीगत सांगीतली .त्यावरुन लागलीच सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यामुळे मी ए.टि.एम. मधुन पैसे काढण्यासाठी व चाबी तयार करण्यासाठी बाहेर गेलो व काहीच वेळात ला.प्र.वि. अमरावती कार्यालयात परत आलो. त्यानंतर पो.नि.सुजाता बन्सोड मॅडम यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचानामा ची कार्यवाही केली.त्यानंतर मी व पंच क्र 1 असे माझ्या चारचाकी वाहनाने व सापळा पथक शासकीय वाहनाने राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती करीता निघालो व काही वेळानंतर कार्यालयाच्या आवारात पोहचलो.आमच्या पाठोपाठ सापळा पथकही कार्यालयाच्या आवारात पोहचले व तेथे गेल्यावर मला मी श्री. दाबेराव सरांना फोन लावुन मी कार्यालयात आलो असल्याचे सांगीतले त्यावरुन दाबेराव यांनी मला म्हटले की,वर यायची गरज नाही मी ड्रायव्हरला खाली पाठवतो.त्याच्याजवळ पैसे देवुन दे त्यावरुन ड्रायव्हर संजय देहाडे हे खाली आले त्यानंतर मी त्यांच्या समक्ष दाबेराव सरांना फोन लावला व विचारले की, मी ड्रायव्हर जवळ पैसे देवु का? त्यावर दाबेराव सरांनी होकार दिला त्यावरुन मी 15,000/- रु. हे ड्रायव्हर संजय देहाडे यांच्याजवळ दिले.त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याबाबतचा नियोजित इशारा दिला. त्यावरुन लागलीच सापळा पथकातील पो.नि. सुजाता बन्सोड मॅडम व स्टाफ यांनी ड्रायव्हर संजय देहाडे व त्यानंतर निरीक्षक श्री. दाबेराव साहेब यांना ताब्यात घेतले. एकंदरीत लोकसेवक श्री.दाबेराव यांनी राज्य उत्पादन शुल्क विभाग राजापेठ, अमरावती येथे माझ्यावर गुन्हा दाखल गुन्हयामधील जप्त करण्यात आलेले वाहन क्र MH 29 AR 1036 होण्डा अमेझ हे वाहन सोडविण्यासाठी तसेच दारुचा धंदा सुरु ठेवण्यासाठी मंथलीकरीता असे 15,000/ रुपये दयावे लागतील अशी लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. व लागलीच करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान सदर लाचेची रक्कम ड्रायव्हर संजय देहाडे यांच्याकडे देण्यास सांगीतल्यावरुन मी सदर रक्कम ड्रायव्हर संजय देहाडे यांच्या हातात दिली.

ड्रायव्हर संजय देहाडे यांनी माझेकडुन 15,000/- रुपयाची लाच रक्कम पंचासमक्ष माझेकडुन स्विकारल्यावरून ड्रायव्हर संजय देहाडे व त्यानंतर श्री.दाबेराव साहेब यांना ताब्यात घेण्यात आले.त्यांनतर पो.नि.सुजाता बन्सोड यांनी दोन्ही लोकसेवक यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव 1.श्री.सुरज रतनसिंग दाबेराव वय 50वर्ष पद-निरीक्षक,नेमणुक राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती (वर्ग-2) रा.कॉंग्रेसनगर सिंग्रीचर सोसायटी फ्लॅट नंबर 610, सी.व्हिंग अमरावती 2.श्री.संजय झिमाजी देहाडे वय 57 वर्ष पद-चालक, नेमणुक राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती (वर्ग-3) रा.एम.आर.कॉलनी फ्लॅट नंबर 2भांदकर रेसीडन्सी अमरावती असे सांगितले श्री.संजय झिमाजी देहाडे यांचेकडुन लाच रक्कम खात्री करुन पंचामार्फत ताब्यात घेण्यात आली. सदरवेळी मोबाईलव्दारे चित्रीकरण करण्यात आले.केलेल्या संपुर्ण कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. एकंदरीत लोकसेवक श्री.दाबेराव यांनी राज्य उत्पादन शुल्क विभाग राजापेठ, अमरावती येथे माझ्यावर दाखल गुन्हयामधील जप्त करण्यात आलेले वाहन क्र MH 29 AR 1036 होण्डा अमेझ हे वाहन सोडविण्यासाठी तसेच दारुचा धंदा सुरु ठेवण्यासाठी मंथलीकरीता असे 15,000/ रुपये दयावे लागतील अशी लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. व लागलीच करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान सदर लाचेची रक्कम ड्रायव्हर संजय देहाडे यांच्याकडे देण्यास सांगीतल्यावरुन मी सदर रक्कम ड्रायव्हर संजय देहाडे यांच्या हातात दिली. ड्रायव्हर संजय देहाडे यांनी माझेकडुन 15,000/- रुपयाची लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावरून ड्रायव्हर संजय देहाडे व त्यानंतर श्री.दाबेराव साहेब यांना ताब्यात घेण्यात आले.करीता 1.श्री.सुरज रतनसिंग दाबेराव वय 50वर्श पद-निरीक्षक,नेमणुक राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती (वर्ग-2) रा.कॉंग्रेसनगर सिंग्रीचर सोसायटी फ्लॅट नंबर 610, सी.व्हिंग अमरावती 2.श्री.संजय झिमाजी देहाडे वय 57 वर्श पद-चालक, नेमणुक राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती (वर्ग-3) रा.एम.आर.कॉलनी फ्लॅट नंबर 2भांदकर रेसीडन्सी अमरावती यांचे विरुदध कायदेशीर कार्यवाहीस्तव फिर्याद देत आहे. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद** केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
vipul nivrutti hulawale
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

मला प्रत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Punit kashinath ku
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PobN15101000402pkkr

**प्रेसनोट**

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १४.०८.२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १. सुरज रतनसिंग दाबेराव, वय ५० वर्षे, पद –निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक अमरावती रा. कॉग्रेस नगर सिग्नीचर सोसायटी, फ्लॅट न. ६१० सी.वींग, अमरावती (वर्ग 2)<br>२. संजय झिमाजी देहाडे, वय ५७ वर्षे, पद – चालक राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक अमरावती रा. एम.आर कॉलनी फ्लॅट न.२ भांदकर रेसीडेन्सी, अमरावती (वर्ग 3) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १४/०८/२०२५ चे १४/२१ ते १४/३० वा.दरम्यान |
| ४ | घटनास्थळ | राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, अमरावती विभग, अमरावती |
| ५ | मागणी केली लाच रक्कम | १५,०००/–रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | १५,०००/–रुपये |

**थोडक्यात हकिकत** :– यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे किराणा दुकान असुन त्याव्यतिरीक्त ते दारुविक्रीचा व्यवसाय करतात दिनांक १६/७/२०२५ रोजी तक्रारदार यांचेवर राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक अमरावती विभाग, अमरावती यांनी तक्रारदार यांचेवर गुन्हा दाखल केला असुन तक्रारदार यांचे चारचाकी वाहन क्र MH 29 AR 1036 होण्डा अमेझ हे जप्त करण्यात आले होते. ते वाहन सोडण्यासाठी व दारुचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी मंथली १५,०००/ रुपयाची लाचेची मागणी केली अशी तक्रार दीली.

सदर तक्रारी वरून आज दि. १४.०८.२०२५ रोजी वरील नमुद लोकसेवक क्र १ यांनी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना पंचा समक्ष त्यांचे वाहन क्र MH 29 AR 1036 होण्डा अमेझ हे वाहन सोडण्यासाठी व दारुचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी १५,०००/ रुपये अशी लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले व सापळा कार्यवाही दरम्याण आलोसे क्र १ यांचे सांगण्यावरुन आलोसे क्र २ यांची लाचरक्कम पंचासमक्ष स्विकारली.

वरुन दोंन्ही आलोसे यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र, श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र. वि.अमरावती, पो.नि. चित्रा मेसरे पोनि. सुजाता बन्सोड, पो. अंमलदार प्रमोद रायपुरे, शैलेश कडु, महेन्द्र साखरे, चालक पोउपनि सतीश कीटुकले, यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: १. श्री मारुती जगताप पोलीस अधीक्षक ला.प्र.वी अमरावती परीक्षेत्र अमरावती
मो.न. ९८५०४८८७८८
२. श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वी अमरावती मो.न. ९७६४२१०४८५
३. श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, घटकप्रमुख ला.प्र.वि.अमरावती मो.न.९८२३१११५५, ७५१७५७१०६४

संपर्क: अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, मो.न.९४०४२९९६२६, टोल फ्रि नंबर– १०६४.

सुजाता गुलाबराव बन्सोड
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती